12:59:53 PM

नि. दि. दावा क्र. ३२/२०१४

गणपत वि. सुनिता

निशाणी क्र. ३३ लगत

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ याचा पुढील उलटतपास विधिज्ञ श्री. निकम**

१२. दावा मिळकतीचा गट क्र.४३१ आहे व त्यातील प्लॉटचा क्र.१० आहे. प्लॉट नंबर १० ज्या लेआऊटमध्ये आहे त्या संपूर्ण जागेचे मालक तानाजी तारडे होते. मला हे सांगता येणार नाही की, तानाजी तारडे यांच्या नावे काही प्लॉट शिल्लक आहेत किंवा कसे. हे खरे आहे की, तानाजी तारडे यांनी प्लॉट क्र.१० माझे चुलते तेजराव सखाराम साळुंके यांना विक्री केलेला आहे. हे खरे आहे की, सदर विक्री ही १९९३ साली झाली होती. ती रजिस्टी ४० X ४० क्षेत्राची होती. ती रजिस्ट्री मी पाहिलेली आहे. आता मला निशाण ३८/२ येथे खरेदील पत्राची सहिशिक्कयाची नक्कल दाखविण्यात आली. सदर रजिस्ट्री तीच आहे ती मी पाहिली होती. (सदर रजिस्ट्री साक्षीदाराला मान्य असल्यामुळे व सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाण क्र.७३** देण्यात येते.).

१३. सदर रजिस्ट्री मी वाचून समजून घेतली होती. त्या रजिस्ट्रीतील क्षेत्र, व्यवहार व चतुःसिमा मला मान्य आहेत. जे क्षेत्र माझ्या चुलत्याने विकत घेतले त्याच्या पूर्वेला प्लॉट क्र.११ नमूद आहे तो रामचंद्र बाळा पवार यांचा आहे. मला याची माहिती नाही की, माझ्या चुलत्याने विकत घेतलेल्या प्लॉट नं.१० च्या पश्चिमेला प्लॉट क्र.९ आहे किंवा कसे. माझ्या चुलत्याने विकत घेतलेल्या प्लॉट नं.१० च्या दक्षिणेला सरकारी रस्ता आहे व उत्तरेला प्लॉट नं.१३ आहे.

१४. हे खरे आहे की, माझे चुलते जेव्हा ४० X ४० चे मालक झाले त्यावेळेस त्यांनी दोन लोकांना मिळकती विकल्या. हे खरे आहे की, ते लोक म्हणजे

मी व डॉ. कैलास कौतिक साबळे हे आहेत. हे खरे आहे की, मला क्षेत्र विकण्यापूर्वी माझे चुलते यांनी डॉ.कैलास कौतिक साबळे यांना सन २००६ मध्ये क्षेत्र विकले होते. आता मला निशाण ३८/३ येथे माझे चुलते व डॉ.कैलास कौतिक साबळे यांच्यामधील खरेदी पत्राची सहिशिक्क्याची नक्कल दाखविण्यात आली. सदर रजिस्ट्री तीच आहे ती मी पाहिली होती. (सदर रजिस्ट्री साक्षीदाराला मान्य असल्यामुळे व सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाण क्र.७४** देण्यात येते.). हे खरे आहे की, मला त्या व्यवहाराबाबत आक्षेप नाही.

१५. निशाण ७४ वरील खरेदी पत्रात पूर्वेला रामचंद्र बाळा पवार असे लिहलेले आहे ते म्हणजे प्लॉट नं.११ बाबत आहे. हे खरे आहे की, २००६ ला जी डॉ.कैलास साबळे यांना विक्री केली त्याचे क्षेत्र २० X ४० असे होते. असे म्हटले बरोबर होईल की, प्लॉट नं.१० चा निम्मा भाग विकला. हे खरे आहे की, माझे चुलत्यांनी डॉ.कैलास साबळे यांना विक्री केलेल्या क्षेत्राच्या पश्चिमेला त्यांची त्या प्लॉटमधील राहिलेली जागा, दक्षिणेला सरकारी रस्ता आणि उत्तरेला संभाजी शामराव यांचा प्लॉट म्हणजे प्लॉट नं.१३ अशी वस्तुस्थिती आहे. हे खरे आहे की, माझ्या चुलत्यांनी जे विकत घेतले त्याप्रमाणेच सदर निशाण ७४ वरील खरेदी पत्रातील चतुःसिमा नमूद आहे.

प्रश्न– डॉ.साबळे यांना उपरोक्त नमूद जागा विकल्यानंतर त्याच्या पश्चिमेला असणारी जागा तुम्ही दोन खरेदी पत्राने विकत घेतली ?
उत्तर– राहिलेले जागा माझी होती. १० X ४० वडीलांची होती व १० X ४० मी विकत घेतली होती.

१६. माझ्या वडीलांची जी मिळकत होती त्याचा प्लॉट नं.१० आहे. सदर माझ्या म्हणण्याप्रमाणे वडीलांच्या नावे प्लॉट नं.१० असल्याचे जे कथन मी केले त्याबाबत ग्रामपंचायत दाखला व सातबा–याची नोंद मी दाखल केलेली आहे. माझे वडील मयत होवून १५ वर्ष झालेले आहेत.

प्रश्न–वडीलांच्या नावे नोंद आजदेखील कायम आहे का ?
उत्तर– वडीलांच्या प्लॉट नव्हताच तो काकांच्या नावे होता.
हे खरे आहे की, मी वडीलांच्या नावे प्लॉट असल्याबाबत खोटे सांगितले आहे. हे खरे आहे की, माझ्या चुलत्यांनी डॉ.कैलास साबळे यांना २० X ४० चे क्षेत्र विकल्यानंतर उर्वरित जे २० X ४० क्षेत्र होत त्यापैकी १० X ४० चे क्षेत्र सन २००८ साली निशाण ५२ प्रमाणे मला काकांनी विक्री केली. हे खरे आहे की, उरलेले १० X ४० चे क्षेत्र २०१२ साली निशाण ५३ वरील खरेदीपत्राप्रमाणे मला काकांनी विक्री केले.

१७. हे खरे आहे की, २०१२ साली जी रजिस्ट्री झाली त्याच्यानंतर माझ्या चुलत्यांचे कोणतेही क्षेत्र शिल्लक राहिलेले नाही. असे म्हटले तर बरोबर होईल की, प्लॉट नं.१० चे निम्म्या भागाचे डॉ.कैलास साबळे मालक झाले व निम्म्या भागाचा मी मालक झालो. हे खरे आहे की, माझ्या निम्म्या तुकड्याच्या पूर्वेला डॉ.साबळे यांचा भाग आहे. डॉ.साबळे यांनी त्यांचा २० X ४० चा प्लॉट आजपावेतो विक्री केलेला नाही.

१८. माझ्या चुलत्यांनी मला २००८ साली ज्या क्षेत्राची विक्री केली ती जागा डॉ.साबळे यांच्या जागेला लागून पश्चिमेला होती. हे खरे आहे की, सन २०१२ साली जी मी १० X ४० ची पट्टी मी विकत घेतली ती प्लॉट नं.९ च्या पूर्वेला होती. हे खरे आहे की, २०१२ साली मी जे क्षेत्र विकत घेतले त्याच्या पूर्वेला मी सन २००८ साली घेतलेले १० X ४० चे क्षेत्र होते व असे मिळून २० X ४० चे क्षेत्र झाले. मी ज्यावेळेस २००८ व २०१२ मध्ये जागा विकत घेतली त्यावेळेस मोजणी करुन घेतली होती. मी खाजगी मोजणी केली होती. मला मोजणीदाराचे नाव आता सांगता येणार नाही.

१९. मी जेव्हा रजिस्ट्र केली त्यावेळेस माझ्या चुलत्याची मुळ रजिस्ट्री पाहून रजिस्ट्री केली होती. दावा दाखल केला त्यावेळेस वकीलांना मी कागदपत्र आणून दिले होते. आता मला निशाण ४/५ येथे दाखल असणारे रजिस्ट्री दाखविण्यात आली. हे खरे आहे की, सदर रजिस्ट्रीची प्रत मी चुलत्याकडून करुन

घेतलेल्या रजिस्ट्रीची छायाकीत प्रत आहे. साक्षीदाराला सदर कागद मान्य असल्यामुळे त्याला **निशाण क्र.७५** देण्यात येते. मी मिळविलेले निशाण ७५ वरील छायांकित प्रत रजिस्ट्री कार्यालयातून मिळवली.

प्रश्न– सदर निशाण ७५ मध्ये पूर्वेस रघुनाथ सखाराम पवार यांचे घर व साबळे असा मजकूर नमूद आहे (निशाण ७५ मधील भागास लाल शाईने रेखांकित करण्यात आले).

उत्तर– ते चुकीचे आहे. ती चतुःसिमा चुकीची आहे.

प्रश्न– आता रेखांकित भागात दर्शविण्यात आलेले लिहण्यात आलेली प्रमाणीत प्रत तुम्ही दाखल करु शकतात का ?

उत्तर–दाखल करु शकतो.

हे खरे आहे की, निशाण ७५ वरील रजिस्ट्री माझी आहे.

प्रश्न– तुमचे असे म्हणणे आहे का ५१६४ या रजिस्ट्रीचे दोन कागद झाले का?

उत्तर– नाही.

२०. सदर रजिस्ट्री खरेदी नंतर माझ्या ताब्यात होती.

प्रश्न– निशाण ७५ वरील रजिस्ट्री ही तुम्ही रजिस्ट्री कार्यालयातून सहि शिक्का सह घेतली असे दाखविणारे सदर रजिस्ट्री वर काही आहे का ?

उत्तर– सदर रजिस्ट्री डुप्लीकेट आहे. साक्षीदार थोड्या वेळाने पुन्हा सांगतो की, मुळ प्रत मी कोर्टात दाखल केलेली आहे. सदर प्रत मी झेरॉक्स करुन दाखल केलेली आहे. ती डुप्लीकेट नाही.

प्रश्न– मुळ रजिस्ट्री जी दाखल केली ती निशाण ७५ वरील रजिस्ट्रीप्रमाणे तंतोतंत आहे का ?

उत्तर– मी वाचलेली नाही.

२१. साक्षीदाराला निशाण ५३ व ७५ वरील रजिस्ट्री दाखविण्यात आले. हे खरे आहे की, निशाण ५३ वरील रजिस्ट्रीवरुन मी निशाण ७५ वरील झेरॉक्स काढली. हे खरे आहे की, ती झेरॉक्स केलेली प्रत मी या कामात दाखल केलेली

आहे. हे खरे आहे की, सदर झेरॉक्स प्रत ही निशाण ७५ वरील आहे. हे खरे आहे की, मी झेरॉक्स काढून प्रत दाखल केल्यामुळे निशाण ७५ वरील प्रतीवर रजिस्ट्री कार्यालयाचा सहिशिक्का नाही. साक्षीदाराला पुन्हा निशाण ५३ व ७५ वरील रजिस्ट्री दाखविण्यात आली.

प्रश्न– निशाण ५३ वरील रजिस्ट्रीमध्ये चतुःसिमेत पूर्वेला काय लिहलेले आहे वाचून दाखवा.

उत्तर– सदर लिहलेली चतुःसिमा चुकीची आहे.

प्रश्न– पूर्वेला रघुनाथ सखाराम पवार यांचे घर असे लिहलेले आहे का

उत्तर– ते चुकीचे लिहलेले आहे. कैलासने रघुनाथला विकलेले आहे.

हे खरे आहे की, निशाण ७५ वरील प्रतीमध्ये "व साबळे" असा जो मजकूर लिहलेले आहे तो निशाण ५३ वरील रजिस्ट्रीत  नाही.

२२. साबळे यांनी रघूनाथ पवार यांना २००६ साली प्लॉट विकली. त्यांनी २० X ४० चे क्षेत्र विकले. त्याची रजिस्ट्री दाखल करु शकतो.

प्रश्न– २००६ साली साबळे यांनी विकले तर तुम्ही निशाण ७५ वरील रजिस्ट्रीमध्ये साबळे असे का लिहले ?

उत्तर– आम्ही लिहलेले नाही.

हे खरे नाही की, दावा दाखल करताना माझ्या लक्षात आले की, रघूनाथ सखाराम पवार हे मालक नसल्यामुळे व साबळे असा शब्द लिहला. माझ्या रजिस्ट्रीमध्ये पूर्वेला रघूनाथ सखाराम पवार यांचे घर आहे असे चुकीचे लिहल्याबाबत माझे जे म्हणणे आहे त्याबाबत मी चुक दुरुस्त करुन घेतली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, काकांनी करुन दिल्यामुळे माझा प्रश्न येत नाही.

प्रश्न– "व साबळे" असा निशाण ७५ मध्ये मजकूर कोणी लिहला

उत्तर– मला माहिती नाही.

प्रश्न– नक्कल ज्या वेळेस दाखल केली तेव्हा "व साबळे" लिहलेले होते

उत्तर– मी आत्ताच पाहिली.

रघुनाथ सखाराम पवार यांची रजिस्ट्री पुढील तारखेला दाखल करु शकतो.

**दुपारची सुटी झाल्यामुळे उलटतपास तहकूब**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन  स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.02.01 18:11:21 +0530

(वि. द. पाटील)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कन्नड.

कन्नड.
दिनांक : ०१/०२/२०२५
02:00:23 PM

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 01/02/2025 |
| Order signed by the Presiding Officer | 01/02/2025 |
| Order uploaded on | 01/02/2025 |